## सरसेनापती हंबीरराव मोहिते सारथी मोडीलिपी प्रशिक्षण प्रकल्प २०२४-२५

**लाभार्थी पात्रता :-**

१) उमेदवार हा सारथी लक्षित गटातील (मराठा, कुणबी, कुणबी-मराठा व मराठा-कुणबी) असावा.

२) उमेदवाराकडे महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याचे प्रमाणपत्र असावे. (तहसीलदार यांचे महाराष्ट्राचा रहिवाशी असल्याबाबत प्रमाणपत्र (Domicile Certificate)

३) उमेदवार हा नॉन- क्रिमिलेयर असावा.

४) उमेदवाराकडे सक्षम अधिकाऱ्याने प्रमाणित केलेले जातीचे प्रमाणपत्र असावे.

५) मराठा जातीच्या उमेदवाराकडे सक्षम अधिकाऱ्याने प्रमाणित केलेले जात प्रमाणपत्र असावे आणि नॉन- क्रिमीलेयर प्रमाणपत्र किंवा मागील ०३ वर्षाचे उत्पन्न प्रमाणपत्र असावे. (उपविभागीय अधिकारी / तहसिलदार यांचे प्रमाणपत्र)

६) मराठा जातीच्या उमेदवाराकडे जातीचे प्रमाणपत्र नसल्यास EWS/SEBC प्रमाणपत्र असावे. (सक्षम प्राधिकारी यांचे प्रमाणपत्र)

७) कुणबी, कुणबी-मराठा व मराठा-कुणबी जातीच्या उमेदवाराकडे जातीचे प्रमाणपत्र आणि नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र किंवा मागील ०३ वर्षाचे उत्पन्न प्रमाणपत्र असावे.

८) निवड केलेल्या कोर्ससाठी आवश्यक असणारी शैक्षणिक अर्हता उमेदवाराकडे असणे आवश्यक आहे.

९) उमेदवाराचा जन्माचा दाखला किंवा १० वी चे प्रमाणपत्र जोडावे.

१०) उमेदवाराचे आधार कार्ड जोडावे.

११) उमेदवाराने ऑनलाईन ॲप्लिकेशन सोबत आवश्यक प्रमाणपत्रे अपलोड करणे आवश्यक आहे.

**अटी व शर्ती :-**

१) किमान ८०% वा अधिक उपस्थिती असल्यास विद्यावेतनास (स्टायपेंड) विद्यार्थी पात्र राहील. (उर्वरित २०% उपस्थिती मधील सूट यामध्ये आजारपण, इतर परीक्षा, वैद्यकीय / वैयक्तिक कारणे इत्यादी या करिता ग्राह्य धरली जाईल)

२) उपस्थिती अहवाल विद्यापीठाने प्राधिकृत केलेल्या व्यक्तींच्या मार्फतच सारथी संस्थेस प्रत्येक महिन्याच्या पाच तारखेच्या आत विद्यार्थ्याने सादर करावा. उपस्थिती अहवालावर सबंधित अधिकारी यांचे नाव, स्वाक्षरी व शिक्का असणे अनिवार्य आहे.

३) प्रशिक्षणास रुजू झाल्यानंतर तसेच अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर सारथी/ शासनाने वेळोवेळी दिलेल्या सूचना विद्यार्थ्यास बंधनकारक राहतील.

४) पहिल्यांदा अर्ज करणारा व सर्व कागदपत्रांची विहित मुदतीत पूर्तता करणारा विद्यार्थी हा प्रथमतः प्रवेशास

पात्र राहील. First Come First Priority (अटी व शर्तींचा अधीन राहून)

५) सदरील अभ्यासक्रम कोणत्याही कारणास्तव अर्धवट सोडून दिल्यास सारथी मार्फत विद्यार्थ्यावर केलेला संपूर्ण खर्च (अभ्यासक्रम शुल्क व विद्यावेतन) वसूल करण्यात येईल.

६) सदर विद्यावेतन फक्त ऑफलाइन कोर्सेस करताच उपलब्ध असेल.

७) प्रवेश प्राप्त झाल्यानंतर कोणत्याही कारणास्तव विद्यार्थी पहिल्या १५ दिवसात गैरहजर असल्याचे निष्पन्न झाल्यास सदर विद्यार्थ्याचा प्रवेश रद्द करून पुढील पात्र उमेदवारास प्रवेश दिला जाईल.

८) विद्यापीठाने निश्चित केलेल्या संख्येपेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाल्यास अतिरिक्त अर्ज हे प्रतीक्षा यादी मध्ये ठेवण्यात येतील सदर प्रतीक्षा यादी ही मा. संचालक मंडळ सारथी यांच्या मान्यतेस अधीन राहून त्या त्या शैक्षणिक वर्षास पात्र / ग्राह्य धरली जाईल.

९) विद्यार्थ्याने अर्ज करताना नमूद केलेले व निवड केलेले विद्यापीठ प्रशिक्षण कालावधी दरम्यान बदलता येणार नाही.

१०) सदर योजनेचा लाभ फक्त मोडीलिपी अभ्यासक्रमापुरताच मर्यादित आहे, इतर अभ्यासक्रमास लागू नाही.

११) प्रवेशासाठी विहित कालावधीत पात्र यादी पैकी ३० % महिला ५% दिव्यांग व १% अनाथ असे आरक्षण विद्यापीठाने निश्चित केलेल्या संख्येवर लागू असेल.

१२) सारथी मार्फत सदर अभ्यासक्रमाचा लाभ घेत असताना सदर कालावधीत विद्यार्थ्याकडून कोणताही गैरप्रकार / बेशिस्त वर्तन आढळल्यास प्रवेश रद्द करून विद्यार्थ्यावर केलेला संपूर्ण खर्च (प्रशिक्षण शुल्क व विद्यावेतन) वसूल करण्यात येईल.